Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# महात्मा जोतिबा फुले यांचे शेती विषयी विचार

प्रा. डॉ. विद्यासागर पुंडलिक सोनकांबळे
इतिहास विभाग, मोरेश्वर महाविद्यालय
भोकरदन, जि. जालना
मो. न. ९४२३४६०५७०

महात्मा फुले यांनी समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्यासाठी अपार कष्ट केले आणि कार्य करीत असताना सामाजिक, शैक्षणिक प्रश्नांवर अहोरात्र कष्ट करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या हितासाठी त्याच्यावर होणार्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी महान कार्य केले. भारत हा कृषी प्रधान देश मात्र परंपरागत चालत आलेल्या व्यवस्थेचा तो सदैव गुलाम राहीला. म्हणुनच म. फुले नी इ. स. १८८३ मध्ये 'शेतकर्याचा आसुड ' हा ग्रंथ लिहून शेतकर्यांच्या प्रश्नावर वाचा फोडली जगाचा पोशिंदा म्हणून ज्या शेतकर्यांकडे पाहतो त्याची यथिल व्यवस्थेने कशी पिळवणूक, शोषण केले यावर म. फुले नी विवेचन केले. भारतीय शेतकरी हा अज्ञानी असल्यामुळे त्याच्या वाट्याला दारिद्य, उपासमार, कर्जबाजारीपणा नित्याचेच बाब झाली होती म्हणूनच महात्मा फुले यांनी शेतकर्यांची होणारी पिळवणूक थांबण्यासाठी तो शिक्षित झाला पाहिजे असा आग्रह धरतात.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा असला तरी यथिल धर्ममार्तंड, भट्ट, सावकार, व्यापारी यानी शेतकर्यांना वेगवेगळ्या प्रकारे लुटले. 'गुलामगिरी' या ग्रंथात भट्टाना द्यावयाची दक्षिणा, सावकाराचे अव्वाच्या सव्वा व्याज, सरकारी शेतसारा यामुळे शेतकरी कायमस्वरूपी दारिद्यातच जगत होता. या सर्व बाबींवर म. फुलेनी वरील दोन ग्रंथातून शेतकर्यांच्या पिळवणूकीस कोण दोषी आहे हे सागींतले आहे.

भारतातील अर्थकारण पुर्णतः शेती भोवतीच फिरत आलेले आहे यथिल समाज जास्त प्रमाणात शेतीवरच उपजिवीका करत असतो मग तो शेतकरी असो किंवा शेतमजूर हे म. फुले यांनी हेरले होते. " शेतीचा विकास हा शेतकरी व शेतमजूराच्या कष्टावर अवलंबून आहे याची त्यांना कल्पना असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडकीने मांडले दिसून येतात त्यांचे शेती व शेतकरी यांचे विषयीचे विचार आजही उपयुक्त आहेत अलिकडच्या सततच्या दुष्काळाच्या पाश्वभूमीवर त्यांचे शेतीविषयक विचार निश्चितच उपयुक्त आहेत. " [१] ऊन पाऊस याची पर्वा न करता सतत कष्ट करणारा शेतकरी दु: खात व सरकारी दरबारी नौकरी करणारा घटक सुखी हा

एक प्रकारचा भेदभाव आहे ही असमानता दूर करण्यासाठी म. फुले नी लेखणीतून इग्रज दरबारी अर्ज विनंती करून शेतकर्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र कष्ट केले.

महात्मा फुले यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला होता त्यामुळे शेतकऱ्यां समोर येणार्या समस्या त्यांनी पाहिल्या व अनुभवल्या होत्या. अतिवृष्टी, अनावृष्टीमुळे तसेच शासकीय कर, सावकारी कर्ज यामुळे तो नेहमी कर्जात जिवन व्यतीत करत होता. अशा अवस्थेत भारताचे अर्थ चक्र ज्या शेती भोवती फिरत असते अशा वेळी शासनव्यवस्थेने पुरक लक्ष देणे गरजेचे असते मात्र या ठिकाणी भारत देशच पारतंत्र्यात जगत असल्याने न्याय मागण्यासाठी जावे तरी कुठे असा प्रश्न निर्माण झाला याविषयी म. फुले म्हणतात " परकीय आर्यांनी येथे क्षेत्रियावर हल्ले करून त्यांना गुलाम केले येथील शेतकऱ्यांचा राजा बळी यास त्यानी कपटाने पराभुत केले यानंतर शेतकर्यांच्या दैन्यावस्थेला सुरूवात झाली. हे दैन्य जर दूर करावयाचे असेल तर पुन्हा बळीचे राज्य स्थापन केले पाहिजे "[२] शेतकरी हा जगाचा पोशिंदा असे आपण म्हणतो मात्र त्याची सदैव अवहेलनाच झालेली आहे भारतीय समाज व्यवस्थेवर धर्माचा पगडा कायमचा राहिलेला आहे यातुन शेतकरीही सुद्धा सुटला नाही. धार्मिक व्यवस्थेने निर्माण केलेल्या विधी, रुढी मध्ये तो गुरफटून गेला आहे परिणामतः जन्मा पासून मृत्यूपर्यंत वेगवेगळ्या विधी चक्रात तो अडकून पडला आणि शेती उत्पन्नातून मिळालेले धनधान्य धार्मिक विधी वर खर्ची करू लागला आणि नेहमी प्रमाणे दारिद्यात दिवस काढु लागला.

प्रा नरके सर याविषयी म्हणतात " फुले यानी 'शेतकऱ्यांचा आसुड 'आणि ' ब्राह्मणाचे कसब' या ग्रंथात भट भिक्षुका कडून शेतकऱ्यांचे शोषण केले होते याचे चित्रन केले फुले म्हणतात की, शेतकर्यांच्या ज्या अंधश्रद्धा आहेत देव भोळेपणा आहे त्याचा फायदा या पुरोहीताने घेऊन शेतकर्यांना वृत, विधी, पुजा पिठाचे शूल्क कायम त्याच्या पाठिमागे ठेवले हे पुरोहित वस्तू आणि पैशाच्या स्वरूपामध्ये शेतकर्यांना लुबाडत " [३] फुले नी शेतकऱ्यांच्या केले असे नाही तर वरील ग्रंथातून धर्माच्या नावाखाली लुटणाऱ्यामुळे आपली अवनती झाली हे सांगतात व यावर उपाय ही सुचवितात.

महात्मा फुले यांनी शेती व शेतकर्यांच्या हितासाठी धार्मिक अवडंबर बाजूला ठेवून व अज्ञान, रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यास मूठमाती द्यावी तरच शेतकरी सुखी होईल असे म्हणतात. तसेच शेती विकासासाठी शेती ला औद्योगिकीकरणाची जोड द्यावी विज्ञानवादी तंत्रज्ञानाचा वापर

करावा म्हणजेच शेती दर्जेदार उत्पादन देईल व शेतकर्या बरोबर देश प्रगतीपथाच्या दिशेने वाटचाल करेल हा विचार ही सुचवितात. शेतकर्यांना नवनवीन तंत्रज्ञान माहिती मिळावी याविषयी सांगत असताना इग्रज, मुसलमानांनी त्याच्या आहारात गाय, बैल या प्राणी एवजी शेळी, बकरे याचे मासं आहारात घ्यावे शेळ्या मेंढ्यांच्या खतांचा वापर शेती साठी करावा यामुळे शेती चे उत्पादनात वाढ होते म्हणून त्याची पैदास वाढवावी यासाठी परदेशातून उत्तम दर्जाची शेळी मेंढी चे बेणे खरेदी करून त्या प्रकारच्या पशुंची निर्मिती करण्याविषयी सुचवितात. यामुळे शेतकरी जर शेती उत्पादनात तोट्यात गेला तर हा जोड धंदा त्यास उदरनिर्वाह करण्यास मदत करेल हा मार्ग म. फुले सागंतात

महात्मा फुले यांनी उपेक्षित घटकांना सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला शेतकरी, शेतीवर अवलंबून असणारा शेतमजूर, आलुतेदार- बलुतेदार या घटकांना न्याय देण्यासाठी ग्रंथ लिहिले वेळप्रसंगी शासन दरबारी जाऊन प्रश्न मांडले. फुले नी जी ग्रंथ लिहिला त्यात पावलोपावली मानवतावाद दिसून येतो. या लेखणीतून भट व्यवस्थेने शेतकर्यांची कशी पिळवणूक केली हे वास्तव त्याच्या पुढे आणले हा समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास कसा झाला हे फुले नी दाखवून दिले एक प्रकारे त्यांना चेतवण्याचे कार्य केले.

महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी इंग्रज सरकार पुढे जाऊन शेतकर्यांच्या मुलांना शिक्षण देण्याविषयी व शेतकर्याना शेतीपयोगी मदत करण्यासाठी अर्ज विनंती करतात ज्या प्रमाणे यथिल धर्म व्यवस्थेने शेतकऱ्यांचे शोषण केले त्याच बरोबर त्याची अवनती होण्यासाठी इतरही अनेक कारणे होती या विषयी म. फुले म्हणतात " ब्रिटिश राज्य येण्यापुर्वी राज्य लोकांनी व सस्थांनिकानी पदरी मोठे सैन्य ठेवले होते त्यात मोठ्या संख्येने लोक नोकरी करीत त्यामुळे शेतजमिनीवर मोठा भार पडत असे पेशव्यांचे राज्य लयास गेल्यावर मराठ्यांच्या सैन्यातील लोक घरी बसले........ .. सैन्यातील लोक घरी आल्याने शेतजमिनीवर त्यांचा भार पडला शांततेच्या काळी लोकसंख्या ही वाढली कुटुंबातील वाटपामुळे शेतजमिनीचे लहान-लहान तुकडे पडले त्याची गती थाबेंना तुकडे झालेल्या शेतजमिनीच्या उत्पन्नावर कुटुंबांची आणि गुरेढोराची गुजरान करताना शेतकर्यांच्या नाकीनऊ यवु लागले जंगल खात्यानी ग्रामीण भागातील कुरणे घशात घातली त्यामुळे शेळ्यामेंढ्यास चरावयास जागा राहीली नाही शेतकर्यांना आधारा साठी शेतजमीन उरली नाही जमीन धुऊन गेली त्यामुळे तिचा सुपिकपणा कमी झाला शेतजमिनीचे जे तुकडे पडले ते या मोठ्या शेतकर्यांजवळ नांगर व बैल होते त्यांना करावयास वा

विकत देण्यात आली आणि भूमिहीन झालेले शेतकरी कोष्ट्याकडे, सुताराकडे, लोहाराकडे उदरनिर्वाहासाठी काम मिळावे म्हणून फिरू लागली. "[४] महात्मा फुले यांनी भट शाही बरोबरच वरील व्यवस्था ही शेतकर्यांच्या दारिद्री अवस्थेस कशी जबाबदार आहे हे सागंतात अज्ञानामुळे शेतकरी हा शेती विकासापासून कोषो दूर आहे परीणामी उत्पन्न अल्प आहे यामुळे उपासमारी त्याच्या पाचवीलाच पुजलेली आहे याच्या बरोबर सततचे दुष्काळ, वेगवेगळे साथीचे आजार शेतसारा या संकटामुळे तो सतत दारिद्यात जगत असतो. अस्मानी, सुलतानी व भटुकशाही मुळे त्याचे शोषणच झाले आहे शेती विषयक प्रश्नांवर म. फुले यांनी सुक्ष्म अभ्यास करून वरील प्रमाणे विवेचन केले आहे.

शेतकरी हा इंग्रजी राजवटीत कसा दबला गेला आहे याविषयी म. फुले म्हणतात "शेतकऱ्याने आपल्या कुटुंबासह शेतात दिवस – रात्र खपावे त्यावेळी त्यास सारा लोकल फंड वरून महीन्याला माणसी तीन- तिन रूपय पडत नाहीत आणि युरोपियन नौकरास व काळ्या कामगारास दरमहा पंधरा रुपये किरकोळ खर्चास व दारु पाण्यास पुरत नाहीत इंग्रजांनी शेतकर्याला नागडा व उघडा केला आहे त्यास खाण्यास पुरेसे अन्न नाही घालायला कपडे नाहीत"[५] भारतीय शेतकरी इंग्रजी अमलापुर्वि कसा नाडला गेला तीच परिस्थिती इंग्रजी राजवटीतही होती म्हणून म. फुले शेतकरी व शेतमजूर याचा कायापालट करण्यासाठी इंग्रज सरकारकडे शेतकरी हितासाठी शिक्षण व विज्ञान हे त्यांच्या पर्यंत पोहचवण्याचा आग्रह धरतात.

सारांश

महात्मा फुले यांनी ज्याप्रमाणे यथिल वंचित घटकाना न्याय देण्यासाठी शैक्षणिक चळवळ सुरू केली अनेक संकट झेलली त्याच प्रमाणे शेतकर्यांच्या एकंदरीत दैण्याअवस्थेचा बारकाईने अभ्यास केल्या नंतर शेतकर् याचा आसुड, गुलामगिरी हे दोन ग्रंथ लिहून यथिल उच्चवर्णीय समजला जाणारा समाज भटभिक्षूक, सावकार, शेतसारा यामुळे शेतकरी कसा विपन्नावस्थेत जिवन जगत आहे याचे रेखाटन वरील ग्रंथात केले आणि ही शोषण व्यवस्था कशी शेतकर्याची पिळवणूक करते हे दाखवून दिले. या सर्व संस्थेचे निराकरण करण्यासाठी शेतकर्यांच्या मुलांना आधुनिक, विज्ञानवादी शिक्षण दिले पाहिजे असे आवर्जून सांगतात. म फुले नी अठराव्या शतकात शेती प्रश्नांवर जे विचार मांडले ते अभ्यासपूर्ण होते.

संदर्भ

१) सहस्त्रबुद्धे मु. ग. (सपां.) – लोकहितवादींची शतपत्रे (चौ. आ. १९७२) कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. पृ. १७२

२) डॉ. सांळूखे आ. ह. – महात्मा फुले आणि शिक्षण (प. आ. २०१३) लोकायत प्रकाशन सातारा. पृ. २

३) प्रा.नरके हरी- महात्मा फुले समग्र वाङ: मय ( इ. स. २०१३) महात्मा ज्योतिराव फुले चरीत्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन मुंबई पृ. ३०१

४) तर्कतीर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री- ज्योती चरीत्र ( चौ. आ. २००४) नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया दिल्ली. पृ ४६

५) डॉ. चौसाळकर अशोक- महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ (स. आ. २००९) लोकवाङ: य गृह मुंबई. पृ. ३५